# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८वी)

### रविवार दि. २४ फेब्रुवारी, २०१९

### अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची

**<u>प्रसिध्दिपत्रक</u>**

रविवार दि. २४ फेब्रुवारी, २०१९ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इ. ५वी) आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८वी) या परीक्षेच्या प्रत्येकी दोन्ही प्रश्नपत्रिकांची अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची परिषदेच्या www.mscepune.in व http://puppss.mscescholarshipexam.in या संकेतस्थळावर या परीक्षेचे परीक्षार्थी, मार्गदर्शक शिक्षक, पालक, शाळा आणि क्षेत्रिय अधिकारी यांच्या माहितीसाठी प्रसिध्द करण्यात येत आहे.

१) या उत्तरसूचीवर / प्रश्नपत्रिकेतील कोणत्याही प्रश्नांवर आक्षेप असल्यास त्याबाबतचे ऑनलाईन निवेदन परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन स्वरूपात करता येईल.

२) सदर ऑनलाईन निवेदन शाळांकरीता त्यांच्या लॉगिनमध्ये Dashboard वरील डाव्या बाजूस Query Management या हेडिंगखाली व पालकांसाठी संकेतस्थळावर Queries For Question Paper / Interim Answer Key या हेडिंगखाली स्वतंत्ररित्या उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

३) त्रुटी / आक्षेपाबाबतचे ऑनलाईन निवेदन भरण्याकरीता दिनांक ०६/०३/२०१९ ते १५/०३/२०१९ रोजी पर्यंत मुदत देण्यात येत आहे.

४) दि. १५/०३/२०१९ नंतर त्रुटी / आक्षेपाबाबतचे निवेदन स्वीकारले जाणार नाही.

५) उपरोक्त ऑनलाईन निवेदनाशिवाय इतर कोणत्याही प्रकारे (टपाल, समक्ष अथवा ईमेलव्दारे) प्राप्त त्रुटी / आक्षेपाबाबतच्या निवेदनांचा विचार केला जाणार नाही.

६) उपरोक्तनुसार विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या ऑनलाईन निवेदनांना वैयक्तिकरित्या उत्तर पाठविले जाणार नाही.

७) विहित मुदतीत प्राप्त झालेल्या ऑनलाईन निवेदनांवर संबंधित विषय तज्ज्ञांचे अभिप्राय घेऊन अंतिम उत्तरसूची परिषदेच्या संकेतस्थळावर यथावकाश प्रसिध्द करण्यात येईल.

**(तुकाराम सुपे)**
**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१**

**ठिकाण - पुणे**
**दिनांक -** ०६/०३/२०१९

E:\KUNAL\2019\LETTER.docx